Name of the Newspaper: Maharashta Times

Date: 19/01/2017

General Secretary, Nidhi Sunil Dumbre’s Article



**झेविअर्सपासून ते एसएनडीटीपर्यंत सगळीकडे सध्या चर्चा आहे ती ड्रेसकोडचीच. कॉलेजलाइफ म्हणजे मजा, मस्ती आणि फॅशन...पण ह्या फॅशनवर आता झेविअर्सपासून ते एसएनडीटीपर्यंत सगळीकडे 'ड्रेसकोड'ची छडी उगारली गेली आहे. अनेक कॉलेजांमध्ये फॅशनचा अतिरेक होतो म्हणून ड्रेसकोड ठेवण्यात आला आहे. पण 'ड्रेसकोडमुळे आमच्या सुरेक्षेची हमी मिळणार का?' असा सवाल काही कॉलेजांच्या गर्ल्स जनरल सेक्रेटरींनी केलाय. अनेक तज्ज्ञांनीही यावर आपली भूमिका मुंटाकडे मांडलीय...**

# ड्रेसकोडं

**मानसिकता बदला**

कॉलेजमध्ये ड्रेसकोड नसावाच. शाळेत असताना दहावीपर्यंत युनिफॉर्म असतो. त्यामुळे कॉलेजमध्ये आल्यावर परत ड्रेसकोड नको. कॉलेजमध्ये आम्ही तेवढे मोठे आणि जबाबदार झालेलो असतो. त्यामुळे त्याबाबत स्वातंत्र्य मिळायला हवं. त्यामुळेच ड्रेसकोडची बंधनं नको वाटतात. शेवटी वाईट प्रवृत्ती ही त्या माणसाची मानसिकता असते, ड्रेसकोडमुळे त्यात फार फरक पडू शकत नाही.

**-निधी डुंबरे**, पोदार कॉलेज

**सुरक्षेची हमी मिळेल?**

व्यक्तीस्वातंत्र्य हा खूप महत्वाचा मुद्दा आहे. आजच्या काळात मुलींसाठी ड्रेसकोड हा प्रकार योग्य नाही. ड्रेसकोड असला तरी एक प्रश्न उरतोच की, अंगभर कपडे परिधान करूनही मुलीच्या सुरक्षेविषयी शाश्वती देता येत नाही. उलट बंधनं घातली गेल्याचं दडपण येतं. त्यामुळे ड्रेसकोड टेकन उगाच न्यूनगंड निर्माण करण्यापेक्षा तो नसणं कधीही चांगलं.

**- आर्चा नायर**, सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग

**ड्रेसकोड चांगलाच**

प्रत्येक जण कॉलेजमध्ये शिकायला येतो. त्यामुळे ड्रेसकोड असला, तरी त्यात काही वावगं नाही. उलट वैयक्तिक स्तरावर हा एक प्रकारे चांगलाच निर्णय आहे. पाश्चात्य ट्रेंड फॉलो करावा, पण आपली संस्कृती विसरू नये.

**- शिवानी पंडित**, ॲग्नेल पॉलिटेक्निक, वाशी

**स्वातंत्र्याचा गैरफायदा नको**

कॉलेजमध्ये ड्रेसकोडचं बंधन नसावं. कारण कॉलेजमध्ये तुम्हाला हवे तसे कपडे घालता येतात. शाळेनंतर कॉलेजमध्ये आल्यावर तरी यातून मोकळीक मिळावी. पण यालासुद्धा मर्यादा असाव्यात. स्वातंत्र्याचा गैरफायदा नको.

**- तृषाला नायक**, रुईया कॉलेज

**पार्टीवेअर नको**

मुलींनी पार्टीला घालणारे कपडे किंवा शॉर्टस घालूच नये असं नाहीय. त्यासाठी एखादा तसाच प्रसंग पाहावा. कॉलेजमध्ये शैक्षणिक वातावरण कायम राहण्यासाठी योग्य ड्रेसकोड आवश्यकच आहे.

**- श्वेता त्रिपाठी**, व्हीजेटीआय

**नियम नको**

कॉलेजमध्ये एखादा विशिष्ट ड्रेसकोड नसावा. ज्याला ज्या कपड्यांमध्ये आरामदायी वाटेल त्याला ते कपडे घालण्याची मुभा असावी. आपल्या मनाप्रमाणे जगण्याचा मुलांसारखाच मुलींनाही समान हक्क असावा.

**- अनुष्का सिंह**, उषा मित्तल कॉलेज ऑफ इंजि., एसएनडीटी

## 'पिंजरा तोड' मोहिम

दिल्लीतल्या एका कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना रात्री उशिरापर्यंत हॉस्टेलबाहेर राहण्यास प्रतिबंध करणारी नोटीस काढण्यात आली होती. त्यावर २०१५मध्ये एका विद्यार्थिनीने कॉलेज प्रशासनाला खुलं पत्र लिहिलं होतं. ते व्हायरल झालं आणि यातून जन्म झाला 'पिंजरा तोड' मोहिमेचा. देशभरामधल्या कुठल्याही शैक्षणिक संस्थांमध्ये महिलांवर होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अन्यायाला वाचा फोडण्याचं काम यातून होतं.

**ड्रेसकोडपेक्षा मानसिकता बदला...** एसएनडीटीसारख्या शैक्षणिक संस्थांचा इतिहास बघता त्यांनी नेहमी पुरोगामी विचारांना प्रोत्साहन दिलं आहे. अशावेळी एकविसाव्या शतकात ड्रेसकोडसारखा नियम आणण्याचा विचार त्यांनी का बरं केला असावा? मुळात आपल्या समाजात नियम फक्त स्त्रियांसाठीच का? किमान शैक्षणिक संस्थांनी तरी वेगळा विचार करायला हवा. समाजातील मानसिकता बदलण्याऐवजी आपण ड्रेसकोड का बदलतोय? फॉर्मल कपडे घालण्याची सक्ती करण्यापेक्षा स्वरक्षणाचे धडे घेण्याची सक्ती केली तर ते जास्त योग्य ठरेल. किंबहुना या दृष्टीनं उपयुक्त ॲप्स बनवणाऱ्या स्टार्टअप्सना मदत करणं महत्त्वाचं ठरेल असं मला वाटतं.

**- रेणुका शहाणे**

**गरजच नाही...** कोणत्याही कॉलेजने ड्रेसकोड ठेवण्याची गरज आहे असं मला वाटत नाही. जात-धर्म, आणि वयानुसार ड्रेसकोडची व्याख्या बदलत जाते. मुली-स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला कोणत्याही प्रकारचा ड्रेस कारणीभूत नाही. त्यामुळे ड्रेसकोड ठेवण्याची काहीच गरज नाही. माणसांच्या मानसिकतेत बदल होणं गरजेचं आहे.

**- क्रांती जेजुरकर**, चेअरपर्सन, वुमन डेव्हलपमेंट सेल, मुंबई युनिव्हर्सिटी

विद्यार्थिनीचं खुलं पत्र... *वाचा पान ३*

**@MumbaiTimesMT Poll** कॉलेजमध्ये मुलींसाठी 'ड्रेसकोड' असावा का? आणि ड्रेसकोड ठेवून मुलींच्या सुरक्षेची हमी मिळेल का? तुम्ही तुमचं मत @MumbaiTimesMT वर नोंदवू शकता. https://twitter.com/MumbaiTimesMT/status/821605885520789504?s=08

संकलन:- दीपश्री आपटे, संपदा जोशी, नेहा कदम, संतोष बोबाडे, आकाश कदम, ईशान घमंडे, आदेश पुरंदरे, अनुश्री पवार (कॉलेज क्लब रिपोर्टर)